# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/11/2022 (रविवार) सकाळ


## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील बस स्टॅाड काटोल येथे दिनांक ०४/११/२०२२ चे १६.३० वा. ते १६.४५ वा. चे सुमारास फिर्यादी नामे– मंगेश प्रभाकर टेकाडे, वय २६ वर्ष हे काटोल बस सटॉप वरून बसमध्ये चढत असता फिर्यादीच्या पॅन्टचे मागचे खिशात ठेवलेले नगदी २०,०००/– रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन काटोल करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मेटपांजरा शिवार येथे ०१/११/२०२२ चे १२.३० वा. ते १२.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– सचिन बळीरामजी काळे, वय ३१ वर्ष, रा. काटोल यांना शिवपाल ठोंबरे यांनी फोन करून सांगीतले की, ०५ सिंमेटचे पोल बूडा पासून तूटलेले दिसत आहे. अशा माहीती वरून मेटपांजरा शिवारात जावून पाहीले असता ०५ सिमेंट पोल तूटलेले त्यावर ११ के. व्ही. लाईनचे तार १२०० मिटर किंमती अंदाजे ३५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन काटोल करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर